# शासकीय तंत्रनिकेतन छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

उस्मानपुरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर - 431005

फोन [illegible] 2353044

website : www.gpabad.ac.in

E mail : principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र. शातंनिछसं/एक्यूएसी/२०२४/ 331 दिनांक : १२/०७/२०२४

**महत्वाचे परिपत्रक: (One Time Opportunity)**

विषय – ६ व्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना पाचवे व सहावे सत्र पूर्ण करण्याची एक वेळ संधी देण्याबाबत. (One Time Opportunity)

संदर्भ – १. मरातंशिम / डी -५१/एकवेळ संधी /२०२४/४००३ दि. ०४/०७/२०२४

२. संस्थेची परीक्षा विषयक नियमावली २०१३ नियम ER ४-C.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद मान्यता प्राप्त पदविका अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम संस्थेने सुधारीत करून ७ वा अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे अशा अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम ते चतुर्थ सत्र ७ व्या अभ्यासक्रमाचे असून केवळ पाचवे व सहावे सत्र हे ६ व्या अभ्यासक्रमाचे आहे. **त्यामुळे ६ व्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे अंतिम वर्ष आहे.**

६ व्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या तथापि चतुर्थ सत्राचा निकाल Fail असल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये पाचव्या सत्रात प्रवेश घेण्यास अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ६ व्या अभ्यासक्रमांतच सत्र पूर्ण करण्याची एक वेळ संधी (One Time Opportunity) खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. सदरची संधी केवळ सत्र पूर्ण करून घेण्यासाठीच आहे. पाचवे सत्र जे विद्यार्थी संस्थेच्या परीक्षा नियम ER-२ आणि ER-३ नुसार पूर्ण करतील त्यांनाच सहाव्या सत्रात प्रवेश देण्यात येऊन सहावे सत्र पूर्ण करून घेण्याची संधी देण्यात येईल.
२. पाचव्या सत्रात सत्रकर्म पूर्ण न केल्यामुळे जे विद्यार्थी थोपवले जातील (Detained) त्यांनी संधी गमावली आहे, असे समजण्यात येईल व त्यांना सहाव्या सत्रात प्रवेश देण्यात येणार नाही.
३. सदर संधी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी विभागप्रमुखांनी स्वतः विद्यार्थ्यांना/पालकांना याबाबत संपूर्ण मार्गदर्शन करावे.
४. हिवाळी परीक्षा २०२४ मध्ये मागील सत्राच्या अनुत्तीर्ण विषयांत जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील व संस्थेच्या परिक्षा विषयक नियमावलीनुसार पाचव्या सत्राकरिता प्रवेशास पात्र होतील त्यांना उन्हाळी परीक्षा २०२५ पासून पाचव्या/अथवा पाचव्या व सहाव्या सत्राची परीक्षा देता येईल.
५. एकवेळ संधी साठी पात्र विद्यार्थ्यांची यादी विभागप्रमुखांमार्फत विभागाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी संस्थेच्या Online प्रणालीद्वारे Registration करणे बंधनकारक राहिल. Registration करतांना विद्यार्थ्यांनीआवश्यक ते शुल्क भरुन हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. ही संधी केवळ सत्रकर्म पूर्ण करून घेण्यासाठीच असल्याने अशा विद्यार्थ्यांचे हिवाळी परीक्षा २०२४ साठीचे अर्ज विद्यार्थी परिक्षेस बसण्यास पात्र होईपर्यंत भरून घेण्यात येणार नाहीत, याची संबधितांना नोंद घ्यावी.

७. "One Time Opportunity" मुळे एका विशिष्ठ वर्गात विद्यार्थी संख्या जास्त झाल्यास नियमित तसेच सदर संधी प्राप्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता विभागाने वेगळा वर्ग तयार करुन शैक्षणिक कामकाज पूर्ण करावे.

८. या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबधित विभागाची राहील.

९. एकवेळ संधी मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या नियमानुसार Academic Records ठेवणेची जबाबदारी संबधित विभागाची राहील.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी सत्र पूर्ण केलेले आहे त्यांनी संबंधीत विषयाचे Termwork / Journal / Drawing/ Industrial Training / Project जतन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. परिक्षेत पात्र झाल्यावर Oral/Practical परिक्षेचे वेळी सदर Termwork / Journal/Drawing/Industrial Training/Project सादर करणेची जबाबदारी सदर विद्यार्थ्यांची राहील.

११. संबधित विद्यार्थ्यांनी दिनांक १५/०७/२०२४ रोजी दुपारी ३.०० नंतर परीक्षा विभागातून अर्ज श्री. साळुंके यांच्या कडून प्राप्त करुन अर्जामधील संपूर्ण माहिती भरुन सर्व गुणपत्रिका जोडुन अर्ज परीक्षा विभागातील श्री. साळुंके यांच्या कडे दि. १९/०७/२०२४ पर्यंत जमा कराव्यात.

(डॉ. ए. एम. जितूरकर)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

प्रत- १. सर्व विभागप्रमुख यांनी सदरील परीपत्रक विभागाती सुचना फलक तसेच विद्यार्थ्यांच्या समाजमाध्यमांवर प्रसारित करावे व विद्यार्थ्यांच्या निर्दर्शनास आणून देण्यात यावे.
(स्थापत्य/यंत्र/स्वयंचल/विद्युत/अणुविद्युत/माहिती तंत्रज्ञान/संगणक/ डी.डी.जी.एम./ विज्ञान/उपयोजित यंत्रशास्त्र/ कर्मशाळा/ ग्रंथालय/वसतिगृह /प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी/ विद्यार्थी विभाग (कार्यालय))

२. श्री. एस.जी. चव्हाण, अधिव्याख्याता माहीती तंत्रज्ञान यांना संस्थेच्या Portal वर upload करण्यास्तव.